IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# कोकणातील लोककला

**सौ. योजना यो. हळदे**

एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**कोकणातील लोककला :**

**कोकणातील नमन खेळे, शिमगा खेळे, जाखडी नृत्य ,भजन या कोकणातील प्रमुख लोककला आहेत.**

**जाखडी -कोकणची लोककला :**

**कोकण म्हटल्यावर आठवतो तो निळाशार  समुद्र, हिरवीगार वनराई आणि सर्व दूर पसरलेली अफाट निसर्ग संपदा. निसर्गाच्या समृद्धते  बरोबरच तितकीच समृद्ध आहे ती कोकणची कलासंस्कृती. याच कोकणातल्या अनेक कला संस्कृतीतला एक कला प्रकार म्हणजे जाखडी.**

**लोकोस्त म्हणजे लोक संस्कृतीला श्रीमंत करणारा विधी होय .हिंदू संस्कृतीमध्ये अनेक सण उत्सव साजरे केले जातात .कोकण परिसरात ही खूप मोठ्या प्रमाणात सण उत्सव साजरे केले जातात .कोकणाचे आणि निसर्गाचे नाते अतूट आहे. सारा कोकण निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे .निसर्गाबरोबर लोककला या इथल्या जगण्याचा स्थायीभाव बनलेला आहे.**

**कोकणात भजन ,शिमग्यातील खिळे, गणपतीतील जाकडी नृत्य, बैठकीचे गाणे ,अशा अनेक लोककला पाहायला मिळतात त्यामुळे कोकणातील सण उत्सवांमध्ये एक वेगळीच लोकसंस्कृती पहावयास मिळते. कोकणातील या कला व उत्सव येथील लोकांना परमेश्वराचे चिंतन व मनोरंजनाची ही महत्त्वाची साधने आहेत त्यापैकी एक म्हणजे 'जाखडी होय. या धार्मिक कार्यक्रमाच्या सादरीकरणातून आपल्या संस्कृतीचा वारसा अव्यहात पणे त्यांनी सुरू ठेवला आहे लोकांचे मनोरंजन ही या कलेमागील उद्देश असतो.**

**कोकणातील एक लोकप्रिय कला प्रकार म्हणजे जाखडी नृत्य होय. जाकडी नृत्य हे 'नागेशेवळी 'यांच्या पंथातून जन्मास आली.' जाखडी 'मधील खडी म्हणजे उभे राहणे .जाकडीचा नाच हा उभ्याने केला जातो म्हणून त्यास 'जाखडी 'असे म्हटले जाते जाकडीचा आणखी एक अर्थ होतो 'जखडणे जाखडी मध्ये नृत्य करण्याची शृंखला तयार केली जाते.जाखडी नृत्यास' बाल्या नाच' असेही**

म्हटले जाते .मुंबईत ग्रामीण भागातील शेतकरी घरघड्याचे काम करत असत त्यांच्या कानात बाली हे आभूषण असे त्या अभूषणावरून ते करीत असलेल्या नृत्याला बाल्यानाच असे नाव पडले .

बाल्या अथवा जाखडी नृत्यास रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी 'चेऊली नृत्य असेही म्हणतात .महाराष्ट्रात जागणे नृत्य लोकप्रियता मिळत आहे.जाकडीला बाल्या जाखडणेकिंवा 'तंभुली नृत्य 'असेही म्हटले जाते. जाखडीत सुद्धा दोन्ही बुवांचे सवाल जवाब होतात. या सवाल जवाब करणाऱ्या दोन्ही शाहिरांना शक्ती तुरा या नावांनी ओळखले जाते. नृत्य या कला प्रकारचा उगम शाहिरी काव्य,तमाशा या लोककलांपासून सुरू झाला. त्यात कलगीवाले व तुरेवाले असे दोन पंथ असतात बाल्या नाचाला कलगीतुरा किंवा शक्ती तुऱ्याचा सामना असेही म्हणतात.

### जाखडी नृत्य जोपासणे काळाची गरज :

सध्यास्थितीचा विचार करता जाखडी नृत्यातील मूळ स्वरूप पूर्णता बदलले आहे. व्यावसायिकरणाच्या बळावर नवनव्या चित्रपटांच्या गाण्यांच्या उच्च स्वरांचा चालींचा आता शक्ती तुरा गायनातील गाण्यांमध्ये सर्रास समावेश आढळतो. पूर्वीची लयबद्ध चाल नृत्यातील अस्सल ठेका आता कोकणात ही अनुभवता येत नाही. कोकणात ही मुंबईकरांसारखी चढाओढ पाहायला मिळते. यापूर्वी शक्तीतुरा या नृत्य प्रकारावर फक्त पुरुषांचेच क्षेत्र होते. मात्र आज शक्ती तुरा या नृत्य प्रकारात महिलांचा सहभाग लाभत आहे. आजचे पुरुष महिला शाहीर शासकीय योजनांचा गाण्यांचा प्रचार प्रसार करीत आहेत. तसेच एकाच वेळी हजारो नागरिकांना जनजागृतीचा सल्ला देत आहेत. म्हणून या लोककलेचे महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे. व ती जोपासणे तुम्हा आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे.

### नमन कोकणची लोककला :

नमन-खेळले हा उत्तर कोकणातील अतिशय लोकप्रिय असा लोककला प्रकार आहे. होळीच्या सुमारास कुणबी समाज गावच्या देवीच्या नावाने नमन खेळे करण्यास प्रारंभ करतो. यांना देवीचे खेळे म्हणून ही संबोधले जाते.

नमन - खेळे हा उत्तर कोकणातील अतिशय लोकप्रिय असा लोककला प्रकार आहे. बहुजन( कुणबी)समाज हा कलाप्रकार सादर करतो धार्मिक विधी म्हणूनच या लोककला प्रकाराकडे पाहिले जाते .लग्नकार्य सत्यनारायण नामकरण विधी अशा शुभप्रसंगी खेळे केले जातात .हे खेळे पेशवाई काळापासून होत असावेत खेळांच्या काही गीतांतून राघोबा दादाच्या नावाचा उल्लेख आढळतो. १७२८

साली श्यामजी नाईक काळे यांनी कर्नाटकातून जो लोककला प्रकारांना त्याचे दोन भाग होऊन एक दशावतार म्हणून दक्षिण कोकणात प्रसिद्ध पावला व नमन -खेळे रत्नागिरी जिल्ह्यात होऊ लागले .नृत्य नाट्य व संगीत यांनी परिपूर्ण असा हा लोककला प्रकाश राशी साम्य दर्शवितो .दोन्हीकडे पायघोळ झगे वापरले जातात.तसेच रामायण महाभारतातील भागांचे गायन कोरस चा वापर करून केले जाते व पात्र त्यावर अभिनय करतात. अंग संगे व लाकडी संगे याबाबतीत ललिता शाही खेळाचे साम्य आढळते यामध्ये ब्राह्मण गावचा पाटील सरकारी अधिकारी अंशाची सोंगे आणून त्यात शब्दांच्या कसरती व अंगी क्षेत्र करून लोकांना पोटभर हसवणे व त्यांची करमणूक करणे हे दोन्हीकडे केले जाते .त्यामध्ये चेहऱ्यावरील भावदर्शनाला भरपूर वावर असतो खेळयातील मुखवटा - नाट्याचे साम्य 'भोवाड्यातील मुखवटा नाट्याशी आढळून येते.मात्र भो वाड्यातील मात पात्र मूक असतात, तर खेळ्यातील पात्र बोलतात .खेळावर लिखित स्वरूपात फारसे काही आढळून येत नाही ही मौखिक परंपरा आहे.

साधारण फाल्गुन महिन्यात होळीच्या सुमारास कुणबी समाज गावच्या देवीच्या नावाने नमन -खेळे करण्यास प्रारंभ करतो.वैशाख महिन्यापर्यंत वेगवेगळ्या गावातून हा लोककला प्रकार चाललेला असतो. गावातील देवीची पालखी आणि खेळे कलावंताबरोबरच बाहेर पडतात म्हणून यांना देवीचे खेळे'म्हणूनही संबोधले जाते. प्रत्येक गावची ग्रामदेवता व तिची पालखी स्वतंत्र असते.

**नमन जोपासणे काळाची गरज :**

कोकणातीलविशेषता रत्नागिरी जिल्ह्यातील नमन खेळे या लोककलेची प्रसिद्धी जगभर पसरली आहे कोकणातील विशेषता रत्नागिरी जिल्ह्यातील नमन खेळे या लोककलेची प्रसिद्धी जगभर पसरली आहे .श्री गणरायाच्या रायाच्या आगमन मृदंग ढोलकीच्या तालावर ठेका धरणारी नटखट आगमन मृदंग ढोलकी तालावर ठेका धरणारे नटखट गवळण काल्पनिक पौराणिक व गणनाट्य सादर करणारे ही नमन लोककला कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना शासनाचे अनुदान नसतानाही कोकणवाशीय जोपासत आहेत.या लोककलेला फार प्राचीन काळापासून रत्नागिरीची पुरण गुहागर संगमेश्वर देवरुख लांजा राजापूर मंडळ या तालुक्यातील लोकांनी ही लोकं जोपासून शासनाच्या भारत सरकारच्या अनेक योजना या लोककलेतून लोकांपर्यंत पोहोचवून त्याविषयी जनजागृती करण्याचे काम पार पाडले आहे. झाडे लावा झाडे जगवा पाणी वाचवा नशाबंदी वृक्षतोड थांबवा स्त्रीभ्रूणहत्या शिक्षणाचे महत्त्व इत्यादी विषयावर या लोककलेतून लोकांपर्यंत संदेश देण्याची महत्वाची भूमिका पार पडली आहे याच कलेचे दुसरे रूप सिंधुदुर्ग पहावयास मिळते त्याला

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

IJARSCT

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

दशावताऱ्या नावाने ओळखले जाते यापुढेही या लोककलांचे जतन होणे काळाची गरज आहे कोकणचे खेळे नमन ही लोककला पूर्वी वीज नसताना पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात रंगाची आज मात्र ही कला हॅलोजनच्या रंगीबेरंगी दुनियेत रंगताना दिसते.कौटुंबिक जीवनावर आधारित पण एक चांगला संदेश देणारी छोटीशी नाटिका सादर केली जाते.या नाटिकेचा विषय सामाजिक जनजागृतीचा संदेश देणाराअसतो.हे संपूर्ण नमन खेळात शिपाई हे आधीच्या पोलीस दलातील हवालदार प्रमाणे असतात. गंभीर विषय विनोदी करून सांगताना त्यातून अनेक संदेश दिले जातात. आपल्या अभिनयातून सामाजिक परिस्थितीचा आढावा घेत असतात.